# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२७ जुलै २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस

## गुन्हयातील एकुण २१ दुचाकी आणि सोन्याचे दागीने हस्तगत

दिनांक २५/०७/२०२० आणि २६/०७/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन २१ दुचाकी **किं. ६,८५,०००/-रू** आणि **२,१९,८००/-रू** चे सोन्याचे दागीने असा **एकुण ९ लक्ष ०४ हजार ८०० रू** चा मुदद्ेमाल हस्तगत केला आहे.

ज्यामध्ये पोलीस स्टेशन वरोरा येथील अप.क्र. ३३१/२०२० कलम ४५७,३८० भादंविच्या गुन्हयातील सोन्याचे दागीने **किं. २,१९,८००/-रू** चा मुदद्ेमाल हा आरोपी नामे १)शाहरूख असलम शेख, वय २२ रा. बांदा दफाईल नं. २ माजरी, २) राकीब सगीर सिददी्की वय २० रा. माजरी यांचे कडुन जप्त करण्यात आला आहे.

तसेच पोलीस स्टेशन वरोरा, चंद्रपुर शहर, रामनगर, सिंदेवाही, चिमुर, मुल, शेंगाव, नागपुर, वर्धा, यवतमाळ जिल्हयातील दुचाकी चोरीच्या दाखल गुन्हयातील एकुण २१ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे. ज्यामध्ये १९ हिरो कंपनीच्या, ०१ टीव्हीएस कंपनीची आणि ०१ सुजुकी कंपनीची मोपेड दुचाकी असे **एकुण ६,८५,०००/-रू** चा मुदद्ेमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचे गुन्हे पोलीस स्टेशन वरोरा येथे अप.क्र. ५७५/२०२० आणि चंद्रपुर शहर येथे अप.क्र. ५५९/२०२० अन्वये नोंद करण्यात आले असुन गुन्हयात आरोपी नामे अमर उर्फ पिंटु पुरूषोत्तम मेश्राम वय २१ रा. उमरी. ता. वरोरा, आणि मयुर मधुकर कांबळे वय २२ रा. बाबुपेठ चंद्रपुर यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ.श्री. महेश्वर रेडड्ी आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर पोलीस निरिक्षक श्री. ओ. जी. कोकाटे यांचे नेतृत्वात सपोनि. बोबडे, पोउपनि. मुंढे, पोउपनि. गदादे, सफौ. भोयर, पोहवा. राजेंद्र खनके, सुरेश केमेकर, करकाडे, आतकुलवार, पोना. प्रकाश बल्की, जमीर, मिलींद चव्हाण, अनुप डांगे, नईम खान, अमजद खान, पोशि. प्रफुल, जावेद सतिश, मिलींद, संजय वाढई, नितीन, वामन, अमोल, गोपाल, प्रशांत, रविंद्र, दिनेश यांनी पार पाडली.

-----------------------------------------------------------

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# दुर्गापुर पोलीसांची कार्यवाही

## आरोपी कडुन चोरीचे गुन्हयातील एकुण १ लक्ष ८० हजाराचा मुद्देमाल हस्तगत

पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील पोलीस पथकाने पोलीस स्टेशन येथे दाखल चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन एका आरोपीस अटक करून एकुण १,८०,०००/-रू चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

यामध्ये आरोपी नामे अमोल आदेश इलमकर वय १९ रा. समतानगर दुर्गापुर यास अटक करण्यात आली असुन आरोपीकडुन गुन्हयातील बजाज पल्सर एमएच ३४ एएल १२५५ किं. ५०,०००/-रू जप्त करण्यात आली आहे. सदर आरोपीची इतर गुन्हयाबाबत कसुन चौकशी केली असता, एक टीव्हीएस स्पोर्ट्स दुचाकी क्र. एमएच ३४ एएच ९५८४ किं. ५०,०००/-रू, गुन्हयात वापरलेली वीक्रांत दुचाकी एमएच ३४ एवाय ९०७१ किं. ४५,०००/-रू, पोलीस स्टेशन पोंभुर्णा हददीतील एक वीवो मोबाईल फोन किं. १०,०००/-रू, पोलीस स्टेशन दुर्गापुर येथील ५ मोबाईल फोन किं. २५,०००/-रू असा एकुण १,८०,०००/-रू चा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीकडुन आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन त्या अनुषंगाने पुढिल तपास दुर्गापुर पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधिक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलिस अधिक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी शिलवंत नांदेडकर यांचे नेतृत्वात पो.नि. दिपक खोब्रागडे, पोउपनि प्रविण सोनोने, पोहवा सुनिल गौरकार, अशोक मंजुळकर, पोना. उमेश वाघमारे यांनी केली.

---

## रामनगर गुन्हे शोध पथकाची मोठी कार्यवाही तिन ९ गुन्हे केले उघळ

पोलीस स्टेशन रामनगर हदिदत दाखल असलेल्या विविध ९ चोरीचे गुन्हे पो.स्टे. रामनगर गुन्हे शोध पथकाने उघडकिस आणले आहे खालील गुन्हा नोंद होताच पो.स्टे. रामनगर गुन्हे शोध पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर गुन्ह्याचा उलगडा लावणे आणि आरोपी निष्पन्न करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. गुन्हे शोध पथकाने आपले तपास कौशल्य वापरून गोपणीय माहिती व तांत्रीक विष्लेशन माध्यमातुन खालील नमुद गुन्हे उघडकिस आणले आहे.

१) अप क्रंमाक १२८७/२०१९ कलम ३७९ भादवि मध्ये २ मोबाईल
२) अप क्रंमाक ५७७/२०२० कलम ३७९ भादवि मध्ये २ मोबाईल
३) अप क्रंमाक ५९२/२०२० कलम ३७९ भादवि मध्ये १ मोबाईल
४) अप क्रंमाक ५९९/२०२० कलम ३८० भादवि मध्ये ३ मोबाईल
५) अप क्रंमाक ३१४/२०२० कलम ४५७,३८० भादवि मध्ये ४ मोबाईल व १पॉवर बॅंक
६) अप क्रंमाक १२७/२०२० कलम ३७९ भादवि मध्ये १ मोबाईल
७) अप क्रंमाक ७०३/२०२० कलम ३७९ भादवि मध्ये १ बजाज प्लसर दुचाकि वाहण
८) अप क्रंमाक ७०४/२०२० कलम ३७९ भादवि मध्ये १ बजाज प्लसर दुचाकि वाहण
९) अप क्रंमाक ६९९/२०२० कलम ४,२५ भा.ह.का. मध्ये १ स्टीलचे धारधार शस्त्र

वरील कार्यवाही दरम्याण तीन संशयीत ईसम नामे १. रोहित आदेश ईलमकर २. ज्ञानदिप चंद्रभान बोरकर व एक विधीसंघर्ष बालक यांचा शोध लाउन ताब्यात घेतले व त्याचे **2,12,500** रूपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोस्टे हदितील सराईत गुन्हेगार नामे धरमविर उर्फ डबल्या अशोक यादव वय २० वर्ष रा. अष्ठभुजा वार्ड याचे विरूदध कलम ३०२,३२६,३२४,३९४,३९२ भादवि अन्वये असे ५ गुन्हे दाखल असुन नमुद आरोंपी मागील ६ महीण्या पासुन पोलीसांना गुगारा देत होता. सदर आरोपी हा कचरा यार्ड जवळ हत्यार सह असल्याची गोपनीय माहीती प्राप्त झाली होती. सदर माहितीच्या अनुषंगाने अत्यंत चालाकीने त्यास त्याचेजवळ असलेल्या हत्यारासह ताब्यात घेतले. व त्याचेवर पो.स्टे. रामनगर अप. क्र. ६९९/२०२० क. ४, २५ भा.ह. का. अन्वये कारवाई करून त्यास अटक केले.

सदरची कार्यवाही पोलिस अधिक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेड्डी आणि अपर पोलिस अधिक्षक श्री. प्रशांत खैरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी शिलवंत नांदेडकर यांचे नेतृत्वात पो.नि. प्रकाश हाके पोलिस स्टेशन रामनगर यांचेसह गुन्हे शोध पथकाचे पो.उप.नि. संदिप कापडे, स.फौ. प्रभुदास माहुलीकर, पो.हवा. मनोहर कामडी, रजिकांत पुट्ठावार, ना.पो.शि. पुरूषोत्तम चिकाटे, रामभाउ राठोड, संजय चौधरी, पो.शि. विकास जुमनाके, म.पो.शि. भावना रामटेके, यांनी केली. केली

# पोलीस योध्दा उपक्रम तसेच भरोसा सेलचे उद्घाटन समांरभ सपन्न

महाराष्ट्र राज्यांतर्गत तसेच चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असुन पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी हे आपले कर्तव्य बजावीत असताना त्यांचेवर गुन्हयांचा तपास, बंदोबस्त, नाकाबंदी, कॅन्टेंटमेंट झोन बंदोबस्त, कोविड केअर सेंन्टर बंदोबस्त, हॉस्पीटल येथील बंदोबस्त, बाहेर राज्यातुन व जिल्हयातुन आलेले प्रवासी यांची तपासणी सेंटर येथील बंदोबस्त व पोलीस डयुटीचा ताण आधीच असताना जिल्हयातील कोरोना बाधीत व त्याचा संपर्कात आलेल्या व्यक्तीवर विशेष लक्ष दयावे लागत आहे. तसेच स्वत:च्या कुटुंबाची सुध्दा जबाबदारी पार पाडत आहे. या सर्व बाबींचा विचार करता पोलीसांना सर्वसामान्य जनतेकडुन विशेषत: युवकांकडुन सहकार्य करण्याची गरज आहे.

याच बाबीच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हयातील युवा पिढीला पोलीसांसोबत काम करुन त्यांच्यासारखे जीवनात कायदा व नियमाचे पालन करुन जीवन जगावे यासाठी ''पोलीस योध्दा'' हा एक अभिनव उपक्रम राबविण्याची योजना तयार करण्यात आली असुन आज दिनांक २७/०७/२०२० रोजी पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथील ड्रिल शेड मध्ये मा. ना. श्री. विजय वडेटट्ीवार, मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, चंद्रपुर जिल्हा यांचे शुभ हस्ते उद्घाटन समारंभ पार पडला. सदर कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ.श्री. कुणाल खेमणार, पोलीस अधीक्षक डॉ.श्री महेश्वर रेडड्ी, श्री. राहुल कार्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रपुर, श्री. शेखर देशमुख, पोलीस उपअधीक्षक(गृह) यांची उपस्थिती होती. आणि सदर कार्यक्रमात कोविड अनुषंगाने सुरक्षितेतेचे साहीत्य सॅनिटायजर, हॅन्ड वॉश, मास्क, फेस शिल्ड, हॅन्ड ग्लब्ज, स्कार्प, टि-शर्ट व ओळखपत्राचे वाटप करण्यात आले.

मा. विजय वडेटट्ीवार, पालकमंत्री महोदयांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलतांना तरूणांनी कोविड आपत्तीजन्य परिस्थितीत पोलीस स्वंयसेवक म्हणुन पोलीसांसोबत काम करण्याची तयारी दाखवुन पोलीस योध्दाची जबाबदारी स्विकारल्याने त्यांना सुध्दा सामाजीक जबाबदारी ची जाणीव असल्याचे दिसुन येत आहे. पोलीस दलाचे या स्तुत्य उपक्रमात जास्तीत जास्त तरूणांनी सहभाग घेवुन समाजाची सेवा करावी असे आवाहन केले आहे.

तसेच मा. विजय वडेटट्ीवार, पालकमंत्री महोदय यांचे शुभ हस्ते पिडित महिला व बालकांच्या मदतीसाठी स्थापित केलेल्या भरोसा सेलचे सुध्दा उद्घाटन कार्यक्रम पार पडला. जिल्हयातील अन्यायग्रस्त महिलांसाठी त्वरीत मानसीक व कायदेशीर मदत व सल्ला देण्याची सोय असलेला स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली असुन सदर ठिकाणी महिलांच्या विरुध्द असलेल्या सर्व प्रकारच्या हिंसाचाराविरुध्द लढण्यासाठी एका छताखाली वैद्यकीय, कायदेशीर, मनोवैज्ञानिक आणि समुपदेशन सहायय सह तात्काळ मदत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

पती पत्नी यांचे कौटुंबीक वाद विकोपाला जावुन विभक्त होण्याचे स्थितीत असलेल्या पती पत्नी चे सदर भरोसा सेल येथे योग्य समुपदेशन केल्यामुळे ते दोघे सध्या एकत्र येवून सुखी दांपत्य जिवन जगत आहे अशा एका दाम्पत्यांचा सत्कार आजच्या उद्‍घाटन प्रसंगी करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे आजच्या आधुनिक काळात पालक व शिक्षकांना न ऐकणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सुध्दा भरोसा सेल मार्फत योग्य समुपदेशन करुन त्यांना शिक्षणाकडे लक्ष पुरवून भावी काळातील एक जबाबदार नागरीक होण्यास प्रेरीत करण्यात येत असल्याने एका पालकांनी याबाबत आपले मनोगत व्यक्त करुन नागरीकांना या भरोसा सेलचा निश्चीत लाभ होईल असे व्यक्तव्य केले.

----------------------------------------------------------------